Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ । अंक १५७ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION



भगवान झुलेलाल यांच्या रूपातील बाप्पा ठरतोय आकर्षण!

(पान २ वर)

Selected

पाच ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे

मुंबई : राज्यात मोसमी पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अधिकृत पंचनामे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार असले तरीही टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होईल. राज्यात मोसमी पावसाने ऑगस्ट – सप्टेंबर महिन्यात ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम अडचणीत आला असून, लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यावर मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आपत्ती निधीच्या निकषांनुसार दुष्काळी स्थितीचे पंचनामे पाच ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

अंतरवाली सराटीत निरोपावेळी भावनिक वातावरण, कुटुंबीयांसह जनसमुदायाला अश्रू अनावर

जरांगे यांच्या भाषेवर मंत्रिमंडळात नाराजी!

मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त केली खंत, मुंबईकडे रवाना होताच आंदोलनाला वेग

जन सम्राट टाईम्स

मुंबई/जालना। मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने रवाना झाल्यानंतर त्यांच्या आंदोलनाला पुन्हा एकदा वेग आला आहे. दरम्यान, राज्य सरकारमधील नेत्यांविषयी जरांगे यांच्याकडून करण्यात येणाऱ्या वक्तव्यांवर मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे समजते. जरांगे यांच्याकडून वापरली जाणारी भाषा अयोग्य असल्याचे सांगत अनेक मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

राज्य सरकारकडून मराठा समाजाच्या मागण्यांबाबत निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू असताना आंदोलकांकडून सरकारवर होणारी टीका आणि त्यासाठी वापरली जाणारी भाषा याबाबत बैठकीनंतरच्या चर्चेत मंत्र्यांनी आक्षेप नोंदवल्याचे समजते. आंदोलन करणे, उपोषण करणे तसेच सरकारच्या धोरणांवर राजकीय टीका करणे हा लोकशाहीतील अधिकार आहे. मात्र, व्यक्तींवर वैयक्तिक स्वरूपाची टीका करताना आक्षेपार्ह किंवा अर्वाच्य भाषा वापरणे योग्य नसल्याची भूमिका काही मंत्र्यांनी मांडल्याचे सांगण्यात येते. मुंबईकडे जरांगे यांचा मोर्चा मनोज जरांगे मंगळवारी सकाळी



सुमारे अकराच्या सुमारास अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. रवाना होण्यापूर्वी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला नमन केले. आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर लोकशाहीच्या मार्गाने अंतिम संघर्ष करण्यासाठी आपण निघालो असल्याचे त्यांनी सांगितले. जरांगे हे २९ ऑगस्टपासून उपोषणावर असल्याने त्यांच्या प्रकृतीचीही तपासणी करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी त्यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यावेळी त्यांना मोठ्या प्रमाणात अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगण्यात आले. गावातील महिलांनी त्यांना ओवाळून निरोप दिला. हजारो महिला आणि मोठ्या संख्येने समर्थक त्यांच्या वाहनासोबत मुंबईच्या दिशेने रवाना झाले. जरांगे यांच्या ताफ्यात दोन अद्ययावत रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. एका मोठ्या वाहनावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला असून, त्यामागे जरांगे यांचे वाहन असल्याचे दिसून आले. कुटुंबीयांच्या भेटीवेळी भावनिक क्षण अंकुशनगर येथे जरांगे यांच्या कुटुंबीयांनी त्यांची भेट घेतली. यावेळी वातावरण अत्यंत भावूक झाले. पत्नी सौमित्रा, मुलगा शिवराज आणि दोन्ही मुलींनी त्यांची भेट घेतली. सौमित्रा यांनी जरांगे यांना औक्षण केले, तर जरांगे यांनी मुलगा शिवराज आणि दोन्ही मुलींना मिठी मारली. या प्रसंगाने उपस्थित समर्थक आणि जनसमुदाय भावुक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

आझाद मैदानाच्या पाहणीवरूनही चर्चा

मुंबई पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली असल्याचे सांगण्यात येत असतानाच, जरांगे यांच्या आंदोलनासाठी मराठा समन्वयकांकडून आझाद मैदानाची पाहणी करण्यात येत असल्याची माहिती आहे. त्यामुळे मुंबईतील आंदोलनाची पुढील दिशा काय असेल, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, हिंदू सण-उत्सवांच्या काळातच मुंबईत आंदोलन का करण्यात येत आहे, असा प्रश्नही मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपस्थित करण्यात आल्याचे समजते. जरांगे यांच्याशी संवाद साधण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ महिला अधिकाऱ्यासोबत झालेल्या कथित वर्तनाचाही बैठकीत उल्लेख झाल्याची माहिती आहे. यावर संबंधित प्रकरणात काय कारवाई करता येईल, याबाबत एका ज्येष्ठ मंत्र्याने भूमिका मांडल्याचे समजते.

राज्यभरात दुष्काळाचे चटके, पाच ऑक्टोबरपासून पंचनामे; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: राज्यात मोसमी पावसाच्या खंडामुळे खरीप हंगाम धोक्यात आल्याने ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे तातडीने पंचनामे सुरू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पंचनामे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणार असले तरीही टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी होईल. दरम्यान, देशातून मोसमी पावसाच्या परतीच्या प्रवासाला पश्चिम राजस्थानातून १९ सप्टेंबरपासून सुरुवात होण्याची शक्यता आहे. देशभरात १ जून ते १४ सप्टेंबरदरम्यानच्या १५ टक्के पावसाची तूट तर महाराष्ट्रात हे प्रमाण १६ टक्के आहे. मोसमी पावसाने ऑगस्ट – सप्टेंबरमध्ये ओढ दिल्यामुळे राज्यभरातील खरीप हंगाम अडचणीत आला असून, लोकप्रतिनिधींकडून दुष्काळ जाहीर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यावर मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय आपत्ती निधीच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार दुष्काळी स्थितीचे पंचनामे ५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याच्या सूचना दिल्या. ग्रामीण भागातील मंत्र्यांनी पावसाअभावी खरीप हंगामाची स्थिती अत्यंत बिकट असल्याचे सांगितले. महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे पिके करपली आहेत. कमी दिवसांत येणारी मूग, मटकी, चवळी यांसारखी कडधान्ये पिके वाया गेली आहेत. सिंचनाची सोय नसलेल्या ठिकाणी पिकांची काढणी करून काही हाती लागेल, अशी स्थिती नाही. उसाची वाढ खुंटली आहे. उसाच्या नव्या लागणी



पाण्याअभावी अडचणीत आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे, अशी एकमुखी आग्रही मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली.यंदाच्या मोसमी पावसाच्या हंगामात जूनमध्ये पाऊस सक्रिय झाला नव्हता. जुलैमध्ये चांगला पाऊस पडल्यामुळे पेरण्यांनी सरासरी गाठली. धरणे भरली. पण, ऑगस्टपासून सप्टेंबरमध्यापर्यंत पावसाने मोठी ओढ दिली आहे. एकूण २० जिल्ह्यांतील ८६ तालुक्यांत ३० दिवसांपर्यंत पावसाचा खंड पडला आहे. उत्तर महाराष्ट्रात ३१, पश्चिम महाराष्ट्रात १७, मराठवाड्यात १६, विदर्भात २२, असा एकूण ८६ तालुक्यांत पावसाचा खंड पडला आहे. आहिल्यानगरमधील कर्जत आणि पुण्यातील शिरुरमध्ये ४३ दिवसांहून जास्त खंड पडला आहे, तर खामगाव (बुलढाणा), संगमनेर (आहिल्यानगर), परांडा (धाराशिव), देवळाली, कळवण (नाशिक), इंदापूर (पुणे), फलटण (सातारा) आणि माळशिरस (सोलापूर) येथे ४० दिवस खंड पडला आहे. ३० दिवसांहून जास्त खंड पडलेले तालुके २७ असून, २५ ते ३० दिवस खंड पडलेले तालुके २६ आहेत.कृषीमंत्री दत्तात्रय भरणे सोमवारपासून मराठवड्यातील दुष्काळी स्थितीची पाहणी करणार आहेत. अकोला, वाशीम, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत पहिल्या टप्प्यात पाहाणी करतील. दुसऱ्या टप्प्यात अहिल्यानगर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत पाहणी करणार आहेत.राज्यात पावसाचा मोठा खंड पडला आहे. अनेक ठिकाणी महिनाभर पाऊस पडला नाही. टंचाई निवारणाच्या उपाययोजना तातडीने सुरू केल्या जातील. एनडीआरएफच्या निकषांनुसार ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे सुरू होतील. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचा प्रभाव गेल्या दोन-तीन दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात होता. त्यामुळे काही भागांत ऑगस्टच्या तुलनेत चांगल्या पावसाची नोंद झाली.

दिघी येथे जहाजबांधणी प्रकल्प उभारण्यासाठी सामंजस्य करार

जन सम्राट टाईम्स

मुंबई |प्रतिनिधी: दिघी येथे नव्याने होणाऱ्या प्रकल्पात जहाजबांधणी केंद्र म्हणून सहभागी होण्यासाठी नॅशनल शिपबिल्डिंग हेवी इंडस्ट्रिज पार्क महाराष्ट्र लिमिटेड आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित पार पडलेल्या या करारामुळे राज्यात ९० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. महाराष्ट्रात ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकसित करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मुंबई बंदर प्राधिकरण यांनी संयुक्तपणे नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेड (एनशिपएमएल) या विशेष उद्देश कंपनीची स्थापना केली आहे. केंद्र शासनाच्या ग्रीनफिल्ड जहाजबांधणी समूह विकास आराखड्यांतर्गत हा प्रकल्प पुढे नेण्यात येत असून, तो 'मेरीटाईम अमृत काल व्हिजन २०४७'च्या उद्दिष्टांना पूरक ठरेल.

या करारानुसार माझगाव डॉक शिपबिल्डर्सने दिघी येथे प्रतिवर्ष किमान १.२ दशलक्ष सकल टनभार (ग्रॉस टनेज) जहाजबांधणी क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांची प्रस्तावित गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे मोठ्या व्यावसायिक जहाजांची निर्मिती करणे शक्य होणार असून, देशाच्या सागरी औद्योगिक क्षमतेला बळकटी मिळेल. दिघीतील या प्रकल्पामुळे आधुनिक जहाजबांधणी पायाभूत सुविधा तसेच त्यास पूरक औद्योगिक व पुरवठा साखळी परिसंस्था विकसित होणार आहे. देशांतर्गत जहाजबांधणी क्षमता वाढ, तंत्रज्ञान व गुंतवणूक आकर्षित करणे, कुशल रोजगारनिर्मिती आणि जागतिक सागरी क्षेत्रातील भारताची स्पर्धात्मकता वाढविण्यास या प्रकल्पामुळे चालना मिळेल.

'सेवा संकल्प अभियान' यशस्वीपणे राबवा : जिल्हाधिकारी घुगे

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: लोककल्याणकारी शासकीय योजनांची माहिती आणि विविध सेवांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासोबतच निश्चित उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करून 'सेवा संकल्प अभियान' यशस्वीपणे राबवावे, अशा सूचना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या. जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियाना'च्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, उपविभागीय अधिकारी योगेश कुमार मीना, अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. जिल्हाधिकारी घुगे म्हणाले, अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक विभागाने सूक्ष्म नियोजन करावे. तालुका आणि शहर पातळीवर विशेष तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्याचा थेट लाभ नागरिकांना मिळेल, याची दक्षता घ्यावी.



नागरिकांना विविध शासकीय सेवा, योजना आणि त्यांचे लाभ यांची माहिती सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर विशेष भर द्यावा. अभियानांतर्गत 'सेवा सेतू' उपक्रमाद्वारे नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये प्रलंबित फेरफार नोंदींचा निपटारा, 'जिवंत सातबारा' मोहीम, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिरींसाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, दिव्यांग प्रमाणपत्र देणे तसेच मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते उपलब्ध करून देणे आदी उपक्रमांचा समावेश आहे. या सर्व उपक्रमांसाठी जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी आवश्यक नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करावी. अभियान केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता त्याचा प्रत्यक्ष लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचेल, यासाठी विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही जिल्हाधिकारी घुगे यांनी स्पष्ट केले. युवा, विद्यार्थी आणि स्टार्टअप्सना 'इनोव्हेशन चॅलेंज'मध्ये संधी 'इनोव्हेशन चॅलेंज' अंतर्गत जिल्ह्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्ती तसेच ग्रामीण भागातील नवकल्पना विकसित करणाऱ्यांना जोडण्यात येणार आहे. स्थानिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

माणुसकी हाच धर्म; मुस्लिम कुटुंबाच्या घरी गेली आठ वर्षे गणरायाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना

सिंधुदुर्ग-गोवा सीमेवरील कोरगावमध्ये मकबूल माळगीमनी यांचा अनोखा गणेशोत्सव

जन सम्राट टाईम्स

कोरगाव, सिंधुदुर्ग | प्रतिनिधी: एकीकडे धर्म आणि जातीच्या नावावर समाजात दरी निर्माण होत असल्याच्या घटना समोर येत असताना, सिंधुदुर्ग-गोवा सीमेवरील कोरगाव येथे सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा सुंदर संदेश देणारे उदाहरण पाहायला मिळत आहे. कोरगाव येथील मकबूल माळगीमनी हे गेल्या आठ वर्षांपासून आपल्या घरी गणरायाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना करून गणेशोत्सव साजरा करीत आहेत. पूजा, आरती, नैवेद्य आणि श्रद्धेने ते गणरायाची सेवा करतात. मकबूल माळगीमनी यांना बालपणापासूनच आपल्या घरी गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्याची इच्छा होती. मात्र, त्यावेळी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. स्वतःचे घर झाल्यानंतरच गणपती बसवावा, असा सल्ला त्यांच्या वडिलांनी त्यांना दिला होता. अखेर स्वतःचे घर उभारल्यानंतर त्यांनी बालपणीचे स्वप्न पूर्ण केले आणि गेल्या आठ वर्षांपासून त्यांच्या घरी गणरायाचे आगमन होत आहे. मकबूल सांगतात की, लहानपणी त्यांनी अत्यंत गरिबीचे दिवस पाहिले. घरात वीज नसताना चर्चमधील मेणबत्त्यांचे मेण आणून त्यापासून घरासाठी मेणबत्त्या तयार केल्या. अनेकदा घरात जेवण बनविण्यासाठी शिधा नसताना मंदिरातून किंवा भंडाऱ्यातून मिळालेले अन्न घरी आणले. त्या काळात मदत करणाऱ्या व्यक्तींनी आपला धर्म किंवा जात विचारली



नाही. या अनुभवातूनच त्यांच्या मनात माणुसकीबद्दलचा आदर अधिक दृढ झाला. 'माणूस आधी आला आणि नंतर धर्म आले,' ही भावना मनात ठेवून मकबूल आज गणरायाची भक्ती करतात.

त्यांच्या घरी गणेशोत्सवाच्या काळात विधीवत पूजा, आरती आणि नैवेद्य केला जातो. त्यांच्या कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकही या उत्सवात सहभागी होतात. 'मी सर्वांना गणपती बसवायला सांगत नाही; मात्र एकमेकांच्या धर्माचा आदर करा,' असा स्पष्ट संदेश मकबूल माळगीमनी देतात. श्रद्धा ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असली, तरी दुसऱ्याच्या श्रद्धेचा आदर करणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांच्या कृतीतून अधोरेखित होते. धर्म वेगळे असले तरी माणुसकीची भावना समान असते, हा विचार त्यांच्या गणेशोत्सवातून समोर येत आहे. कोकणच्या मातीत गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेला हा गणेशोत्सव केवळ एका कुटुंबाचा धार्मिक उत्सव न राहता परस्पर आदर, सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. मकबूल माळगीमनी म्हणतात... 'लहानपणी मला गणपती बाप्पा घरी बसवायचा होता. वडिलांनी स्वतःचे घर घेतल्यानंतर गणपती बसव, असा सल्ला दिला. घर झाल्यानंतर श्रद्धेने गणपती बाप्पाची स्थापना सुरू केली. मी कोणालाही गणपती बसवण्याचा आग्रह करत नाही. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन करावे; मात्र दुसऱ्याच्या धर्माचा आदरही करावा. माणूस आधी आला आणि नंतर धर्म आले, हे आपण विसरता कामा नये.'एकीकडे धर्म आणि जातीच्या नावावर समाजात दरी निर्माण होत असल्याच्या घटना समोर येत असताना, सिंधुदुर्ग-गोवा सीमेवरील कोरगाव येथे सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा सुंदर संदेश देणारे उदाहरण पाहायला मिळत आहे. कोरगाव येथील मकबूल माळगीमनी हे गेल्या आठ वर्षांपासून आपल्या घरी गणरायाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना करून गणेशोत्सव साजरा करीत आहेत. पूजा, आरती, नैवेद्य आणि श्रद्धेने ते गणरायाची सेवा करतात. मकबूल माळगीमनी यांना बालपणापासूनच आपल्या घरी गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करण्याची इच्छा होती. मात्र, त्यावेळी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती.

मातंग समाज मुंबईत काढणार महामोर्चा!

जन सम्राट टाईम्स


मुंबई|प्रतिनिधी: मुंबईत आंदोलनाचे वारे वाहत असताना आता सकल मातंग समाजानेही मुंबईत धडक देण्याचा निर्णय घेत आंदोलनाची हाक दिली आहे. अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी २९ सप्टेंबर रोजी 'मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान' असा निधार महामोर्चा सकल मातंग समाज काढणार आहे. मातंग समाज आक्रमक झाल्याने उपवर्गीकरणाचा थंड बस्त्यात गेलेला विषय पुन्हा केंद्रस्थानी आला आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मंगळवारी मातंग समाजाचे आमदार व चळवळीतील कार्यकर्ते यांची बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली. बैठकीला आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, आमदार जितेश अंतापुरकर प्रा. मच्छिंद्र सकटे, माजी आमदार नामदेव ससाणे, लहुजी समता परिषदेचे अनिल हतागळे, प्रा. मिलिंद आव्हाड उपस्थित होते. बैठकीला प्रत्येक जिल्ह्याचे समन्वयक उपस्थित होते. न्या. बदर समितीने उपवर्गीकरणाचा अहवाल शासनाला सुपूर्त केलेला आहे. यावर एक लाख सूचना व हरकती डॉ. बाबाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेला प्राप्त झाल्या आहेत. त्यावर सुनावणी घेण्यासाठी मुख्य सचिव राजेश आग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. मात्र सरकार याप्रश्नी वेळकाढूपणा करत आहे, याविषयी बैठकीत संताप व्यक्त करण्यात आला. उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी मेपासून राज्यात मातंग समाजाने दवंडी आंदोलन व जनआक्रोश असे ७१ मोर्चे काढले आहेत. मुंबईतील महामोर्चा असेल. मोर्चाला ५ लाख मातंग बांधव येतील, असे आमदार अमीत गोरखे यांनी सांगितले.

विद्यानिकेतनमध्ये शिक्षक-कर्मचाऱ्यांची हाणामारी!

दारूच्या नशेत धिंगाणा व विद्यार्थ्यांना मारहाणीचा आरोप

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : धुळे शहरातील महाराणा प्रताप चौकाजवळील शासकीय विद्यानिकेतन शाळा व वसतिगृह परिसरात शिक्षक आणि कर्मचाऱ्यामध्ये हाणामारी झाल्याचा व्हिडिओ समोर आल्याने खळबळ उडाली आहे. संबंधित शिक्षक दारूच्या नशेत धिंगाणा घालत असल्याचा तसेच विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. या प्रकरणी युवासेना आक्रमक झाली असून, संबंधित शिक्षकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या नेतृत्वाखाली युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या सीईओंची भेट घेत हाणामारीचा व्हिडिओ दाखविला. यावेळी संबंधित शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदनही देण्यात आले. आठ दिवसांत कारवाई न झाल्यास 'शिवसेना स्टाईल'ने उत्तर देण्यात येईल, असा इशारा शिवसेनेने जिल्हा परिषद प्रशासनाला दिला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर शासकीय विद्यानिकेतन शाळा व वसतिगृह परिसरात दोन दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण करण्यात आल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. त्यानंतर दोन शिक्षकांमध्ये नशेच्या अवस्थेत वाद होऊन एकमेकांना मारहाण झाल्याचा व्हिडिओ समोर आल्याचे संघटनेने म्हटले आहे. शाळा व वसतिगृह परिसरात अशा प्रकारच्या घटना घडत असल्यास विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. वारंवार घडणाऱ्या प्रकारांमुळे शासकीय संस्थेची प्रतिमा मलिन होत असल्याचा आरोपही युवासेनेने केला आहे. सीसीटीव्ही फुटेज तातडीने ताब्यात घेण्याची मागणी या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी शाळा व वसतिगृह परिसरातील



सीसीटीव्ही फुटेज तातडीने ताब्यात घेऊन सुरक्षित ठेवावे, अशी मागणी युवासेनेने केली आहे. संबंधित प्रकाराचे पुरावे नष्ट होण्याची शक्यता व्यक्त करत सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. संबंधित शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कठोर पावले उचलावीत, अशी मागणी युवासेनेने केली आहे. आठ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे, युवासेना जिल्हाप्रमुख योगेश मराठे, शहराध्यक्ष अमित खंडेलवाल, दत्ता शिंदे, चेतन धामेच्या, सनी मोरे, जाविद बेग, अनिल ठाकूर, तुषार सातपुते, साहिल चित्ते, सागर पाटील, नितीन धनगर, भूषण पाटील, जिया अन्सारी, आदेश मराठे, प्रीतम धात्रक, सुमित चौधरी, प्रवीण मराठे, गगन पाटील, भूषण मिस्त्री, विशाल पाटील, दिगंबर कासार, कल्पेश चौधरी यांच्यासह युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. धुळे शहरातील महाराणा प्रताप चौकाजवळील शासकीय विद्यानिकेतन शाळा व वसतिगृह परिसरात शिक्षक आणि कर्मचाऱ्यामध्ये हाणामारी झाल्याचा व्हिडिओ समोर आल्याने खळबळ उडाली आहे. संबंधित शिक्षक दारूच्या नशेत धिंगाणा घालत असल्याचा तसेच विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. या प्रकरणी युवासेना आक्रमक झाली असून, संबंधित शिक्षकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या नेतृत्वाखाली युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या सीईओंची भेट घेत हाणामारीचा व्हिडिओ दाखविला. यावेळी संबंधित शिक्षकांवर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदनही देण्यात आले. आठ दिवसांत कारवाई न झाल्यास 'शिवसेना स्टाईल'ने उत्तर देण्यात येईल, असा इशारा शिवसेनेने जिल्हा परिषद प्रशासनाला दिला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर शासकीय विद्यानिकेतन शाळा व वसतिगृह परिसरात दोन दिवसांपूर्वी अमानुष मारहाण करण्यात आल्याचा आरोप युवासेनेने केला आहे.

CSIR-NET परीक्षेत मुस्कानचे उल्लेखनीय यश!

जन सम्राट टाईम्स



भुसावळ| प्रतिनिधी: यावल तालुक्यातील बोरखेडा खुर्द येथील रहिवासी तथा सावदा येथे LIC मध्ये कार्यरत असलेले श्री. राजू तडवी यांची कन्या कु. मुस्कान राजू तडवी हिने CSIR-NET (Life Sciences) जून २०२६ परीक्षेत सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ऑल इंडिया रँक १०१ मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुस्कानने मेहनत, जिद्द, बुद्धिमत्ता आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर ही यशस्वी कामगिरी केली. तिच्या या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवारासह संपूर्ण तडवी समाजाचा गौरव वाढला आहे. विशेष म्हणजे, आदिवासी तडवी समाजातून CSIR-NET जीवन विज्ञान परीक्षेत सहाय्यक प्राध्यापक पदासाठी ऑल इंडिया रँक १०१ मिळविणारी ती पहिली विद्यार्थिनी ठरल्याचा गौरव तिच्या नावावर जमा झाला आहे. तिच्या या यशामुळे समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी नवी प्रेरणा मिळणार आहे. मुस्कानच्या उल्लेखनीय यशाबद्दल समाजाच्या विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात तिने अशीच उत्तुंग भरारी घेत भविष्यात यशाची नवनवीन शिखरे गाठावीत, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान, पिता-पुत्री दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे. ओबीसी जनकल्याण संघाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत बोरकर, विमा प्रतिनिधी सौ. संगीता प्रशांत बोरकर, सलीम तडवी, अमित तडवी, LIC अधिकारी नवज्योत सिंग सिसोदिया, संजय चौधरी, रशीद तडवी यांच्यासह अनेक मान्यवरांनी मुस्कान तडवी आणि तिचे वडील राजू तडवी यांचे अभिनंदन केले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

भगवान झुलेलाल यांच्या रूपातील बाप्पा ठरतोय आकर्षण!



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : साक्री रोड येथील कुमार नगर परिसरातील जय झुलेलाल मित्र मंडळाच्या लाडक्या गणरायाचे मुखदर्शन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे आणि भाजपा नगरसेवक धीरज परदेशी यांच्या हस्ते उत्साहात खुले करण्यात आले. भगवान झुलेलाल यांच्या रूपातील आकर्षक गणेशमूर्ती, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे मंडळाचा गणेशोत्सव यंदा विशेष आकर्षण ठरत आहे. गणरायाच्या आगमनापासूनच मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

मुखदर्शनाचा सोहळा सुरू होताच गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. गणरायाच्या गाण्यांवर मान्यवरांसह मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ठेका धरत जल्लोष केला. *"गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया"*च्या जयघोषाने साक्री रोड परिसर दुमदुमून गेला. यावेळी पै. रावसाहेब गिरासे यांनी गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत जय झुलेलाल मित्र मंडळाच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे कौतुक केले. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी गणरायाचे विधिवत पूजन करून स्थापना केली. १९ वर्षांची गणेशोत्सवाची परंपरा जय झुलेलाल मित्र मंडळाकडून गेल्या १९ वर्षांपासून कुमार नगर, साक्री रोड परिसरात गणरायाची स्थापना केली जात आहे. दरवर्षी विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करून मंडळाने गणेशोत्सवाची परंपरा जपली आहे. यंदाही भगवान झुलेलाल यांच्या रूपातील गणेशमूर्ती साकारण्यात आली असून, ती गणेशभक्तांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. गणरायाचे मुखदर्शन गणेशभक्तांसाठी खुले झाल्यानंतर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे गणेशोत्सवाला विशेष रंगत आली आहे.

याप्रसंगी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे, भाजपा नगरसेवक धीरज परदेशी, जय झुलेलाल मित्र मंडळाचे रिकी गलानी, हितेश रोहिरा, कमल लुंड, हनीष गलानी, वरुण लूल्ला, अनुप डीयालानी यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. साक्री रोड येथील कुमार नगर परिसरातील जय झुलेलाल मित्र मंडळाच्या लाडक्या गणरायाचे मुखदर्शन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पै. रावसाहेब गिरासे आणि भाजपा नगरसेवक धीरज परदेशी यांच्या हस्ते उत्साहात खुले करण्यात आले. भगवान झुलेलाल यांच्या रूपातील आकर्षक गणेशमूर्ती, विद्युत रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे मंडळाचा गणेशोत्सव यंदा विशेष आकर्षण ठरत आहे. गणरायाच्या आगमनापासूनच मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

मांडकीच्या वस्तीसाठी पक्का रस्ता द्या; अन्यथा २३ सप्टेंबरला रस्ता रोको!

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: पाचोरा तालुक्यातील मौजे मांडकी येथील १०० टक्के आदिवासी लोकवस्ती आजही पक्क्या रस्त्याच्या मूलभूत सुविधेपासून वंचित असल्याने एकलव्य आदिवासी संघटनेने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आगामी सात ते आठ दिवसांत रस्त्याचे काम मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्यास २३ सप्टेंबर २०२६ रोजी पाचोरा-जळगाव चौफुलीवर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, आमदार किशोर अप्पासाहेब पाटील, तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे उलटूनही मांडकी येथील आदिवासी वस्तीला पक्क्या रस्त्याची सुविधा उपलब्ध झालेली नाही. यासंदर्भात प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार मागणी करूनही प्रश्न प्रलंबित असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. विद्यार्थ्यांचा चिखलातून प्रवास



पक्क्या रस्त्याअभावी विद्यार्थ्यांना दररोज सुमारे दीड किलोमीटरचा चिखलमय रस्ता पायी पार करून शाळेत जावे लागत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर मोठमोठी डबकी साचून दलदल निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णवाहिकेलाही अडथळा रस्त्याची सुविधा नसल्याने गावात रुग्णवाहिका तसेच इतर वाहने पोहोचणे कठीण झाले आहे. त्यामुळे आजारी व्यक्ती, गरोदर महिला आणि वृद्धांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळण्यात अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आदिवासी वस्तीच्या या मूलभूत प्रश्नाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि पक्क्या रस्त्याचे काम सुरू करावे. अशी मागणी एकलव्य आदिवासी संघटनेने केली आहे. अन्यथा २३ सप्टेंबर रोजी पाचोरा-जळगाव चौफुलीवर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस तसेच संभाव्य परिणामांना प्रशासन व संबंधित लोकप्रतिनिधी जबाबदार राहतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मद्यधुंद चालकाची केंद्रीय मंत्र्यांच्या ताफ्यातील गाडीला धडक

मुरलीधर मोहोळ कोथरूडकडे जात असताना घटना

जन सम्राट टाईम्स

पुणे| प्रतिनिधी: केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वाहनांच्या ताफ्यातील एका गाडीला मद्यप्राशन केलेल्या चालकाने मागून धडक दिल्याची घटना पुण्यातील शिवाजीनगर परिसरातील संचेती पुलाजवळ घडली. या घटनेमुळे काही काळ खळबळ उडाली. शुभम माळी असे संबंधित चालकाचे नाव असून, त्याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे पुणे विमानतळावरून शिवाजीनगरमार्गे कोथरूड येथील निवासस्थानाकडे ताफ्यासह जात होते. त्याच वेळी शुभम माळी हा कार घेऊन त्या परिसरातून जात होता. त्याने मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत वाहन चालविल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. ताफ्यातील गाडीला मागून धडक संचेती पुलाजवळ माळी याने वाहन बेदरकारपणे चालवत मंत्र्यांच्या ताफ्यात प्रवेश केला आणि ताफ्यातील एका वाहनाला



मागून धडक दिली. घटनेनंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला वाहन थांबविण्याचा इशारा केला. मात्र, त्याने पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर सुरक्षा रक्षक आणि पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी चालकाची वैद्यकीय तपासणी केली. या तपासणीत त्याने मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी आणि वाहनांची वर्दळ असताना ही घटना घडल्याने पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने अधिक खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. विविध कलमांनुसार गुन्हा मंत्र्यांच्या सुरक्षा पथकात कर्तव्यावर असलेले सहायक पोलीस फौजदार ईश्वर भिकुले यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार शुभम माळी याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, १८५ आणि ११९/१७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेनुसार आरोपीला नोटीस बजावली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विकास काटे करीत आहेत. डीसीपी ऋषिकेश रावले यांची माहिती या घटनेबाबत पोलीस उपायुक्त (DCP) ऋषिकेश रावले यांनी माहिती देताना सांगितले की, संचेती पुलाजवळ ही घटना घडली. शुभम माळी याने मद्यप्राशन केले होते आणि मद्यधुंद अवस्थेत त्याने केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या ताफ्यातील वाहनाला मागून धडक दिली. याप्रकरणी तातडीने गुन्हा दाखल करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीला सुरुवात

जन सम्राट टाईम्स

मलकापूर । प्रतिनिधी: आगामी २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीची पहिली बैठक हॉटेल औदुंबर, टीव्ही सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. साहित्य, संस्कृती आणि सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम घडवून आणणारे हे संमेलन अधिक



व्यापक, दर्जेदार आणि संस्मरणीय करण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनाची रूपरेषा, विविध साहित्यिक उपक्रम, नियोजन, जबाबदाऱ्यांचे वाटप तसेच साहित्यप्रेमींच्या व्यापक सहभागाबाबत यावेळी विचारविनिमय करण्यात आला. मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेला समकालीन विचारांची जोड देत नव्या पिढीला साहित्याशी जोडणे, नवोदितांना प्रोत्साहन देणे आणि साहित्यिकांना अभिव्यक्तीचे व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, या उद्देशाने संमेलनाचे नियोजन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीस डॉ. संघर्ष सावळे, डॉ. बबन महामुने, डॉ. डी. व्ही. खरात, डॉ. मधुकर दिवेकर, प्रा. डी. के. मांडलिक, डॉ. बेनझीर शेख, रझिया शेख, अभिनिता सावळे आणि आदर्श सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पहिल्याच बैठकीला लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सर्वांच्या सकारात्मक सहभागामुळे आगामी जिल्हा मराठी साहित्य संमेलनाच्या यशाची शुभमुहूर्तमेढ रोवली गेली. सामूहिक प्रयत्नांतून हे संमेलन साहित्यिक वैभव, सांस्कृतिक समृद्धी आणि सामाजिक जाणीव यांचा अविस्मरणीय सोहळा ठरविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

दुष्काळाच्या झळा; गंगाखेड रोडवरील सोयाबीन पीक वाळले



जन सम्राट टाईम्स

गंगाखेड| प्रतिनिधी: परभणी जिल्ह्यातील गंगाखेड रोडलगतच्या त्तरोडा शिवारात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा मोठा फटका सोयाबीन पिकाला बसला आहे. त्तरोडा शिवारातील शेतकरी गंगाबाई मानिकराव शेलके यांच्या शेतातील सोयाबीन पीक पाण्याअभावी वाळून गेले असून, पिकाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पिकाला वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर आवश्यक तेवढे पाणी मिळाले नाही. परिणामी सोयाबीनच्या झाडांची पाने वाळली असून, शेंगांची वाढही समाधानकारक झालेली नाही.

पिकाची सद्यस्थिती पाहता यंदाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून उभे केलेले पीक डोळ्यांसमोर वाळून जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना या नुकसानीचा मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभ तसेच शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

प्रशासनाने या नुकसानीची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड रोडलगतच्या त्तरोडा शिवारात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून,रोडा शिवारातील शेतकरी गंगाबाई मानिकराव शेलके यांच्या शेतातील सोयाबीन पीक पाण्याअभावी वाळून गेले असून, पिकाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पावसाने दडी मारल्याने सोयाबीन पिकाला वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर आवश्यक तेवढे पाणी मिळाले नाही. परिणामी सोयाबीनच्या झाडांची पाने वाळली असून, शेंगांची वाढही समाधानकारक झालेली नाही.

पुरवठा अधिकाऱ्यांविरोधात स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची प्रांताधिकाऱ्यांकडे तक्रार

भुसावळ प्रांताधिकाऱ्यांकडे निवेदन देत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

मुक्ताईनगर। प्रतिनिधी मुक्ताईनगर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात कार्यरत असलेले पुरवठा अधिकारी बोद्रे यांच्या कार्यपद्धतीविरोधात स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने भुसावळ प्रांताधिकाऱ्यांकडे निवेदन देत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. लाभार्थी तसेच स्वस्त धान्य दुकानदारांना विविध प्रकारे त्रास दिला जात असल्याचा आरोप संघटनेने निवेदनातून केला आहे. मुक्ताईनगर तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागासह शासकीय धान्य गोदामातील कामकाजाबाबतही संघटनेने गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांकडे शासकीय धान्य गोदामाचा कोणताही पदभार नसतानाही तेथे बसून धान्य वितरणाच्या कामकाजात हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच गोदामातील प्रशासकीय कामकाजाचा अनुभव नसलेल्या नवनियुक्त कर्मचाऱ्यांवर दबाव आणला जात असल्याचेही संघटनेचे म्हणणे आहे. दुकानदारांना कमी वजनाचे धान्य दिले जात असून, दुकानदारांनी वजन तपासण्यासाठी काटा वापरल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच विविध



तपासणी, ऑडिट पथक, समिती, अन्न आयोग अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाखाली दुकानदारांकडून पैसे मागितले जात असल्याचे संघटनेने म्हटले आहे. याबाबत तक्रार केल्यास दुकानाविरुद्ध कारवाई करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. पुरवठा विभागातील रेशनकार्डसंबंधीच्या ऑनलाइन कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रलंबित प्रकरणे असून, नागरिकांची नावे वाढविणे, नावे कमी करणे यांसारखी कामेही अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याचा दावा संघटनेने केला आहे. आर्थिक व्यवहार केल्याशिवाय काही कामे केली जात नसल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर धान्याचा साठा उपलब्ध असतानाही नव्या लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट केले जात नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. काही ठराविक एजंटांमार्फत आर्थिक व्यवहार करून कामे केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. स्वस्त धान्य दुकानदारांकडून मनमानी पद्धतीने हप्ते वसूल केले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. २५ किंवा २३ क्विंटलसारखे कमी धान्याचे नियतन असलेल्या दुकानांकडूनही २,५०० ते ३,००० रुपये वसूल केले जात असल्याचे निवेदनात नमूद आहे. काही महिला दुकानदारांनाही वेगळ्या प्रकारचा त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करावी, पुरवठा विभागातील प्रलंबित कामकाजाचा आढावा घेऊन नागरिकांची कामे तातडीने निकाली काढावीत, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशीअंती योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

करंजी बु. येथील 85 वर्षीय वृद्धेचे अपहरण अन् हत्या!

४० दिवसांनी थरारक गुन्ह्याचा उलगडा; पारोळा पोलीस व जळगाव LCBच्या संयुक्त तपासात भाचा आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स

पारोळा । प्रतिनिधी: करंजी बु. येथील राहत्या घरातून ३ ऑगस्ट रोजी सकाळी बेपत्ता झालेल्या ८५ वर्षीय वैजंताबाई गणपत माळी यांच्या रहस्यमय बेपत्ता प्रकरणाचा तब्बल ४० दिवसांनंतर उलगडा झाला आहे. पैशांच्या आणि दागिन्यांच्या हव्यासातून सख्ख्या बहिणीच्या मुलानेच मावशीचे अपहरण करून तिची गळा आवळून हत्या केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. जळगाव स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि पारोळा पोलिसांच्या संयुक्त पथकाने संशयित प्रशांत उत्तम माळी (वय ४०) याला ताब्यात घेतले असून, त्याच्या कबुलीनंतर वृद्धेचा मृतदेहही हस्तगत करण्यात आला आहे. बेपत्ता झाल्यानंतर आठवडाभराने तक्रार वैजंताबाई माळी बेपत्ता झाल्यानंतर त्यांचे चुलत पुतणे भैय्यासाहेब हिरामण रोकडे यांनी ९ ऑगस्ट रोजी पारोळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास कैलास साळुंखे यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती आहे. फिर्यादींच्या आरोपानुसार, सुरुवातीच्या तपासात अपेक्षित गांभीर्य दाखवले गेले नाही. संशयित प्रशांत माळी याला पोलीस ठाण्यात आणूनही त्याच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर फिर्यादींनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. LCBच्या तपासाला सुरुवात पारोळा पोलिसांच्या तपासाबाबत समाधान न झाल्याने फिर्यादी भैय्यासाहेब रोकडे यांनी जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी राहुल कोळी आणि हिरालाल पाटील यांच्याशी संपर्क साधून मदत मागितली. १५ ऑगस्टपासून LCBच्या पथकाने तपासाला वेग दिला. दरम्यान, फिर्यादींनी पारोळा पोलीस ठाण्याचे पीआय दीपक पाटील यांची भेट घेऊन तपास अधिकारी बदलण्याची मागणी केली. त्यानुसार १९ ऑगस्ट रोजी तपासाची जबाबदारी API अमोल दुकळे यांच्याकडे सोपवण्यात आली. त्यानंतर तपासाला अधिक वेग मिळाला.

१५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासले; २५० किलोमीटरचा मागोवा

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि DYSP विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांनी दोन स्वतंत्र तपास पथके तयार केली. तपास पथकाने पारोळा, करंजी, अमळनेर, धरणगाव, घाडोदे, मुक्ताईनगर, यावल, धुळे आणि जळगाव परिसरातील तब्बल १५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. सुमारे २५० किलोमीटरच्या



परिसरातील हालचालींचा मागोवा घेत तांत्रिक माहितीच्या आधारे तपास पुढे नेण्यात आला. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ७.१६ वाजता प्रशांत माळी हा वैजंताबाईंच्या अंगणात त्यांच्याशी बोलताना दिसून आल्याचे पोलिसांनी तपासात निष्पन्न केले. त्यानंतर त्याने वैजंताबाईंना भाड्याच्या मारुती स्विफ्ट डिझायर (MH 19 BJ 0071) मध्ये बसवून पारोळ्याच्या दिशेने नेल्याचे फुटेजच्या आधारे समोर आले. नातेवाईकाच्या मृत्यूची खोटी माहिती देत अपहरण पोलिसांच्या तपासानुसार, प्रशांत माळी याच्यावर मोठे कर्ज होते. वैजंताबाईंनी अधिक पैसे देण्यास नकार दिल्यानंतर त्याची नजर त्यांच्या अंगावरील सोन्या-चांदीच्या दागिन्यांकडे गेल्याचे तपासात समोर आले. ३ ऑगस्ट रोजी सकाळी 'शिरसोली येथे नातेवाईकाचा मृत्यू झाला आहे' अशी खोटी माहिती देत त्याने वैजंताबाईंना गाडीत बसवले. त्यानंतर धरणगाव, अमळनेर आणि धुळे परिसरात दिवसभर गाडी फिरवत दागिन्यांची मागणी केली. मात्र, वैजंताबाईंनी दागिने देण्यास नकार दिल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. पोलिसांच्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे १.३० वाजता धुळ्याजवळील नंदाळे फाट्यावर प्रशांतने रुमालाच्या सहाय्याने वैजंताबाईंचा गळा आवळून हत्या केली. त्यानंतर मृतदेह गाडीच्या डिक्कीत ठेवून तो घरी परतला. ४ ऑगस्टच्या संध्याकाळी कानळदा फाटा सर्व्हिस रोडवरील सिमेंटच्या चारीत मृतदेह टाकून दिल्याचे तपासात समोर आले आहे.

४० दिवसांनी आरोपी ताब्यात; मृतदेह CCTV फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे संशयित

प्रशांत माळी याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे सांगण्यात आले. त्याच्या सांगण्यावरून कानळदा फाट्याजवळील चारीतून वैजंताबाईंचा मृतदेह हस्तगत करण्यात आला. आरोपीने काही दागिने धरणगाव, अमळनेर आणि धुळे येथील सोनारांना विकल्याचे, तर काही दागिने धुळ्यातील फागणे परिसरात लपवून ठेवल्याचे तपासात समोर आले आहे.

मुद्देमाल हस्तगत करण्याची कारवाई सुरू आहे. अपहरणाच्या गुन्ह्यात आता हत्या व पुरावा नष्ट करण्याची कलमे वाढणार

पारोळा पोलीस ठाण्यात सुरुवातीला गु.र.नं. ३२२/२०२६ अन्वये BNS कलम १३७(२) आणि १४२ अंतर्गत अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता वृद्धेची हत्या झाल्याचे निष्पन्न झाल्याने हत्या आणि पुरावा नष्ट करणे यांसह इतर गंभीर कलमे वाढविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तपास अधिकारी API अमोल दुकळे आणि पारोळा पोलीस ठाण्याचे पथक पुढील तपास करीत आहे. तब्बल ४० दिवसांच्या तपासानंतर या प्रकरणाचा उलगडा झाल्याने करंजी बु. परिसरात खळबळ उडाली आहे.करंजी बु. येथील राहत्या घरातून ३ ऑगस्ट रोजी सकाळी बेपत्ता झालेल्या ८५ वर्षीय वैजंताबाई गणपत माळी यांच्या रहस्यमय बेपत्ता प्रकरणाचा तब्बल ४० दिवसांनंतर उलगडा झाला आहे.

पैशांच्या आणि दागिन्यांच्या हव्यासातून सख्ख्या बहिणीच्या मुलानेच मावशीचे अपहरण करून तिची गळा आवळून हत्या केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. जळगाव स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि पारोळा पोलिसांच्या संयुक्त पथकाने संशयित प्रशांत उत्तम माळी (वय ४०) याला ताब्यात घेतले असून, त्याच्या कबुलीनंतर वृद्धेचा मृतदेहही हस्तगत करण्यात आला आहे. बेपत्ता झाल्यानंतर आठवडाभराने तक्रार वैजंताबाई माळी बेपत्ता झाल्यानंतर त्यांचे चुलत पुतणे भैय्यासाहेब हिरामण रोकडे यांनी ९ ऑगस्ट रोजी पारोळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास कैलास साळुंखे यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती आहे. फिर्यादींच्या आरोपानुसार, सुरुवातीच्या तपासात अपेक्षित गांभीर्य दाखवले गेले नाही. संशयित प्रशांत माळी याला पोलीस ठाण्यात आणूनही त्याच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

मुख्याध्यापकांच्या दालनात माजी उपमहापौरांना अरेरावी!



जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी : पाल्यांच्या विविध शैक्षणिक अडचणींबाबत मुख्याध्यापकांची भेट घेण्यासाठी गेलेल्या भाजपा नगरसेविका तथा माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर यांच्यासह भाजपा महिला मोर्चाच्या शिष्टमंडळाशी मुख्याध्यापकांच्या दालनातील एका महिला शिक्षिकेने अरेरावी व गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. धुळ्यातील जयहिंद हायस्कूलमध्ये हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. पाल्यांच्या शैक्षणिक अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी भाजपा महिला मोर्चाचे शिष्टमंडळ दुपारच्या सुमारास जयहिंद शैक्षणिक संस्थेत मुख्याध्यापकांची भेट घेण्यासाठी गेले होते. यावेळी मुख्याध्यापकांच्या दालनात उपस्थित असलेल्या महिला शिक्षिकेने शिष्टमंडळातील सदस्यांशी अरेरावी केली. तसेच, पाल्यांचे शैक्षणिक नुकसान करण्याची धमकी दिल्याचा आरोप शिष्टमंडळाने केला आहे. या प्रकारानंतर भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या आक्रमक झाल्या. संबंधित प्रकाराची सत्यता समोर यावी यासाठी मुख्याध्यापकांच्या दालनातील सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, संबंधित शिक्षिकेच्या कथित गैरवर्तनाची चौकशी करून तिच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी संस्थाचालकांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, पाल्यांच्या शैक्षणिक हिताच्या प्रश्नावर शाळा प्रशासनाने पालक व लोकप्रतिनिधींशी योग्य पद्धतीने संवाद साधावा, अशी भूमिका भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. यावेळी भाजपा नगरसेविका तथा माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, मोहिनी धात्रक, संगीता चौधरी, छाया पाटील, उर्मिला पाटील, सुनिता पाटील, सीमा फुलपगारे, शीला भडांगे यांच्यासह भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. पाल्यांच्या विविध शैक्षणिक अडचणींबाबत मुख्याध्यापकांची भेट घेण्यासाठी गेलेल्या भाजपा नगरसेविका तथा माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर यांच्यासह भाजपा महिला मोर्चाच्या शिष्टमंडळाशी मुख्याध्यापकांच्या दालनातील एका महिला शिक्षिकेने अरेरावी व गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. धुळ्यातील जयहिंद हायस्कूलमध्ये हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. पाल्यांच्या शैक्षणिक अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी भाजपा महिला मोर्चाचे शिष्टमंडळ दुपारच्या सुमारास जयहिंद शैक्षणिक संस्थेत मुख्याध्यापकांची भेट घेण्यासाठी गेले होते. यावेळी मुख्याध्यापकांच्या दालनात उपस्थित असलेल्या महिला शिक्षिकेने शिष्टमंडळातील सदस्यांशी अरेरावी केली

नानासाहेब देशमुख यांना प्रथम स्मृतिदिनानिमित्त भडगाव येथे विनम्र अभिवादन

शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील योगदानाला उजाळा

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: जळगाव जिल्ह्यातील ज्येष्ठ सहकार नेते, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक, पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक तसेच पाचोरा-भडगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नानासाहेब बबनराव देशमुख यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त भडगाव येथे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भडगाव येथे आयोजित या अभिवादन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. डी. भैसे होते. यावेळी बोलताना डॉ. भैसे यांनी नानासाहेब देशमुख यांच्या सहकार, कृषी, राजकारण आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला. नानासाहेब देशमुख हे दातृत्ववान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी शेतीला आधुनिकतेची जोड देत प्रगतिशील दृष्टिकोन जपला. त्यांचे कार्य आणि व्यक्तिमत्त्व सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे



त्यांनी सांगितले. आठवणींना उजाळा शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. दिनेश तांदळे आणि मराठी विभागप्रमुख डॉ. अतुल देशमुख यांनी नानासाहेब देशमुख यांच्या सहवासातील विविध आठवणींना उजाळा दिला. डॉ. दिनेश तांदळे यांनी नानासाहेबांच्या शिस्तबद्ध स्वभावाचे आणि सर्वांना सांभाळून घेण्याच्या वृत्तीचे विशेष कौतुक केले. डॉ. अतुल देशमुख यांनी नानासाहेब देशमुख यांच्या कुटुंबवत्सल स्वभावाच्या आठवणी सांगितल्या. ते लहानांसोबत लहानांसारखे तर मोठ्यांसोबत मोठ्यांसारखे वागत. त्यांचा वक्तशीरपणा, काम करण्याची धडाडी आणि प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे संबंध आजच्या तरुणांसाठी शिकण्यासारखे आहेत, असे त्यांनी सांगितले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी नानासाहेब देशमुख यांचे स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या कार्याची प्रेरणा आणि त्यांच्या आठवणी सदैव मार्गदर्शक ठरतील, असेही यावेळी सांगण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी पाटील यांनी केले, तर इतिहास विभागप्रमुख डॉ. चित्रा पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी प्रा. एस. एम. झाल्टे, डॉ. डी. ए. मस्की, प्रा. डॉ. बी. एस. भालेराव, डॉ. सचिन हडोळतीकर, डॉ. गजानन चौधरी, डॉ. बाळाजी पाटील, डॉ. इंदिरा लोखंडे, प्रा. अर्चना टेमकर, डॉ. जनार्दन देवरे, डॉ. अधिकराव पाटील, प्रा. ज्योती नन्नवरे, प्रा. प्रवीण देसले, डॉ. प्राजक्ता देशमुख, प्रा. अंजली माळी, प्रा. मयूर दायमा, प्रा. श्रद्धा देशमुख, प्रा. निशिगंधा बोरसे, डॉ. सागर पाटील, प्रा. श्रद्धा ठाकूर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बहुजन समाजाच्या परिवर्तनासाठी विचारांचे प्रशिक्षण तहसीलस्तरीय प्रशिक्षण शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद!

वैचारिक प्रबोधनातून संघटनात्मक बांधणीवर भर

जन सम्राट टाईम्स

उल्हासनगर। (प्रतिनिधी): महात्मा ज्योतिबा फुले यांच्या क्रांतीवादी जयंती पर्वाच्या निमित्ताने तसेच महाड मानवमुक्ती संग्रामाच्या शताब्दी वर्षानिमित्त बामसेफच्या वतीने रविवार, १३ सप्टेंबर २०२६ रोजी संपूर्ण राज्यात एकाच दिवशी, एकाच वेळी आणि एकाच क्षणी एकदिवसीय तहसीलस्तरीय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यातील कल्याण, उल्हासनगर आणि अंबरनाथ येथे प्रशिक्षण शिबिरे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या प्रशिक्षण शिबिरांमध्ये बहुजन समाजासमोरील वर्तमान सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांची कारणमीमांसा करण्यात आली. या प्रश्नांच्या मुळाशी असलेले सामाजिक वास्तव समजून घेण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. केवळ समस्या मांडण्यापेक्षा त्यांच्या मुळाशी जाऊन कारणांचा शोध घेणे आणि त्यावर संघटितपणे विचार करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. कल्याण येथे बामसेफ प्रशिक्षक ॲड.



पंकज जाधव, उल्हासनगर येथे प्रा. मनोज साडेगावकर, तर अंबरनाथ येथे दिलीप कांबळे यांनी प्रशिक्षण दिले. या शिबिरांना बहुजन समाजातील कार्यकर्ते, युवक-युवती, महिला, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच परिवर्तनवादी विचारांच्या नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली. दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षणातून सामाजिक परिवर्तनासाठी वैचारिक प्रबोधन आणि संघटनात्मक बांधणी यावर विशेष भर देण्यात आला. समस्या समजून घेण्यापेक्षा मुळाशी जाण्याची गरज आजच्या बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत बहुजन समाजाने आपल्या प्रश्नांकडे केवळ तात्कालिक समस्या म्हणून न पाहता त्यांच्या मुळातील कारणे, व्यवस्था आणि त्यामागील सामाजिक वास्तव समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी वैचारिक प्रशिक्षण, जनजागृती आणि संघटनात्मक एकजूट ही काळाची गरज असल्याचा संदेश या प्रशिक्षण शिबिरांतून देण्यात आला. बहुजन समाजातील बुद्धिजीवी, विद्यार्थी, युवक-युवती, महिला, शेतकरी, शेतमजूर, कामगार, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी परिवर्तनाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. इतर तालुक्यांतही प्रशिक्षण शिबिरांची मालिका दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील कल्याण, उल्हासनगर आणि अंबरनाथ येथे झालेल्या प्रशिक्षण शिबिरांनंतर लवकरच जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही अशाप्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती बामसेफचे जिल्हाध्यक्ष गणेश देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीचा मार्ग मोकळा! महाराष्ट्र शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

जन सम्राट टाईम्स

पारोळा। प्रतिनिधी: राज्यातील मुदत संपलेल्या आणि अद्याप निवडणूक न झालेल्या ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय व्यवस्थेबाबत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ग्रामविकास विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केली असून, त्यानुसार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (CEO) मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर



प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. राज्यातील काही ग्रामपंचायतींची मुदत संपलेली असतानाही विविध प्रशासकीय अडचणींमुळे त्यांच्या निवडणुका होऊ शकलेल्या नाहीत. अशा ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी शासनाने प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुलभ केली आहे. नेमका शासन निर्णय काय? महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त करण्याचे शासनाकडे असलेले अधिकार संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (CEO) त्यांच्या अधिकारक्षेत्रापुरते प्रत्यायोजित करण्यात आले आहेत. त्यामुळे ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपलेली आहे आणि प्रशासकीय कारणांमुळे अद्याप निवडणूक झालेली नाही, अशा ग्रामपंचायतींसाठी संबंधित CEO अधिसूचनेनुसार प्रशासक नियुक्तीची कार्यवाही करू शकतील. यामुळे निवडणूक होईपर्यंत ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार सुरळीतपणे चालविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासक किती काळ राहणार? प्रशासकाची नियुक्ती महाराष्ट्र शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राहणार आहे. यापैकी जे आधी घडेल, त्या वेळेपर्यंत प्रशासकाचा कार्यकाळ राहणार असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

बोरगाव बु. येथे 26 वर्षांची 'एक गाव, एक गणपती'ची परंपरा कायम

आकर्षक सजावट, पारंपरिक मिरवणूक आणि भक्तिमय वातावरणाने गाव दुमदुमले

जन सम्राट टाईम्स

बोरगाव बु. । प्रतिनिधी: धरणगाव तालुक्यातील बोरगाव बु. येथे गेल्या २६ वर्षांपासून लोकभावनेतून जपली जात असलेली 'एक गाव, एक गणपती' ही सामाजिक ऐक्याची परंपरा यंदाही मोठ्या भक्तिभावाने कायम ठेवण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालय परिसरात सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने गणरायाची स्थापना करण्यात आली. सुमारे ५ ते ६ हजार लोकसंख्या असलेल्या बोरगाव बु. गावात 'एक गाव, एक गणपती'च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक एकोपा आणि बंधुभावाची परंपरा जोपासली जात आहे.



गणरायाच्या स्वागतासाठी गावात आकर्षक सजावट करण्यात आली असून, पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. यामुळे संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. या उपक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. गणेशोत्सव काळात दरवर्षी भंडाऱ्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यंदाही या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी मोलाचे योगदान दिले. 'एक गाव, एक गणपती'च्या माध्यमातून धार्मिक उत्सवासोबतच सामाजिक ऐक्य, सहकार्य आणि गावातील एकजूट अधिक मजबूत होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. ग्रामस्थांच्या सहभागातून सामाजिक एकोप्याचा संदेश गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता तो सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा उत्सव व्हावा, या भावनेतून बोरगाव बु. येथील ग्रामस्थ गेल्या २६ वर्षांपासून ही परंपरा जपत आहेत. गावातील सर्व समाजघटक एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करत असल्याने 'एक गाव, एक गणपती'चा आदर्श निर्माण झाला आहे. गणपती स्थापनेच्या उपक्रमात अध्यक्ष सुदाम निंबा मराठे, उपाध्यक्ष रविंद्र साहेबराव पाटील, सचिव लक्ष्मण भीमराव पाटील तसेच सदस्य सुनील मिठाराम पाटील, लखिचंद्र वामन पाटील, ज्ञानेश्वर उत्तम मराठे, भाईदास पंतिग पाटील, राजू रायभान पाटील, बापू माधवराव चव्हाण, कैलास गंगाराम पाटील, परशुराम नारायण पाटील, भगवान रावण पाटील, शरद शालिग्राम पाटील, किशोर भास्कर नांदळे यांच्यासह ग्रामस्थांचा सहभाग होता. पुजारी यशवंत जिवराम भालेराव यांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले. तसेच हरी विठ्ठल मित्र मंडळ आणि ग्रामस्थांनी गणेशोत्सवाच्या आयोजनासाठी विशेष सहकार्य केले. गणरायाच्या आगमनाने गावात उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, २६ वर्षांपासून अखंड सुरू असलेली 'एक गाव, एक गणपती'ची परंपरा यंदाही सामाजिक ऐक्याचा संदेश देत आहे.

धुळ्यातील अवैध धंद्यांविरोधात भीम आर्मी आक्रमक!

जन सम्राट टाईम्स

धुळे|प्रतिनिधी: धुळे जिल्ह्यात सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात भीम आर्मी आक्रमक झाली असून, या धंद्यांवर तातडीने कारवाई करण्याच्या मागणीसाठी संघटनेच्या वतीने जेलरोड परिसरात धरणे आंदोलन व साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप भीम आर्मीने केला आहे. या अवैध धंद्यांमुळे गुंडगिरीला खतपाणी मिळत असून, सर्वसामान्य नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. अवैध धंद्यांविरोधात आवाज उठविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांसह पत्रकारांवरही काही वेळा खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. त्यामुळे प्रशासनाने या अवैध धंद्यांची पाळेमुळे उखडून काढत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि जिल्ह्यातील अवैध धंदे सरसकट बंद करावेत, अशी मागणी भीम आर्मीने केली आहे. दरम्यान, प्रशासनाने अवैध धंद्यांवर कारवाई करून ते बंद केले नाहीत, तर आंदोलनाच्या ठिकाणीच अवैध धंद्यांचे स्टॉल लावून प्रशासनाचा निषेध करण्यात येईल, असा इशारा भीम आर्मीचे राहुल वाघ यांनी दिला आहे. या आंदोलनावेळी भीम आर्मीचे राहुल वाघ, सागर चव्हाण, मुस्तकीम खान, अजय मंगळे, मयूर तपासे, अशोक निकम, रोशन केदार, निलेश शिंपी, दर्शील खैरणार, देवेंद्र चौधरी, तेजस पाटील, महेश पाटील, प्रशांत चव्हाण, उमेश पाटील, धनंजय पाटील, वैभव पाटील, योगेश चव्हाण, भूषण वेदे, इरशाद खान, शाहरुख खान, अरकम खान आणि सचिन खरात यांच्यासह भीम आर्मीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उत्सवाच्या खर्चातून पाळधीत साकारतोय 'ऑक्सिजन पार्क'!

कायमस्वरूपी बगीच्याच्या माध्यमातून गावाला हिरवाईची भेट : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

पाळधी खु., जळगाव। प्रतिनिधी: उत्सवाचा आनंद काही दिवसांचा असतो; मात्र त्याच उत्सवाच्या खर्चातून उभी राहिलेली सामाजिक सुविधा अनेक वर्षे समाजाच्या उपयोगी पडते. गणपती व नवरात्रोत्सवातील अनावश्यक खर्चाला फाटा देत त्या निधीतून पाळधी खुर्द येथे आकर्षक बगीचा आणि पर्यावरणपूरक 'ऑक्सिजन पार्क' उभारण्याचा GPS मित्र परिवाराचा उपक्रम समाजासाठी आदर्शवत असल्याचे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. पाळधी खुर्द येथे बहिणाबाई मार्टजवळ, स्मशानभूमीच्या पुढील परिसरात उभारण्यात येणाऱ्या या बगीच्याचे भूमिपूजन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. पालकमंत्र्यांच्या सूचनेतून तसेच युवा नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या संकल्पना आणि प्रयत्नांतून GPS मित्र परिवाराने हा नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. 'रोषणाईपेक्षा कायमस्वरूपी सुविधा महत्त्वाची' यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "उत्सवातील दोन-चार दिवसांच्या रोषणाईपेक्षा त्याच खर्चातून गावासाठी कायमस्वरूपी सुविधा निर्माण झाली, तर उत्सवाला खऱ्या अर्थाने सामाजिक अधिष्ठान मिळते. GPS परिवाराने सेवा केवळ घोषणांमध्ये न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केली आहे." या बगीच्यात पर्यावरणपूरक ऑक्सिजन पार्क, लहान मुलांसाठी खेळण्याची जागा, ज्येष्ठ नागरिकांसाठी फेरफटका व विरंगुळ्याची सुविधा तसेच महिला आणि नागरिकांना प्रसन्न व आरोग्यदायी वातावरणात वेळ घालवता यावा, यासाठी विविध सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. "आज आपण केवळ सौंदर्यीकरण करत नाही, तर पुढच्या पिढीसाठी आनंदाची,



आरोग्याची आणि मोकळ्या श्वासाची जागा निर्माण करत आहोत. उत्सवाच्या खर्चाला विधायक दिशा देऊन समाजासाठी कायमस्वरूपी मालमत्ता उभी करण्याचा GPS परिवाराचा विचार कौतुकास्पद आहे," असेही पालकमंत्री पाटील यांनी सांगितले. आरोग्याच्या दृष्टीने फॉगिंग मशीनचीही भेट याच कार्यक्रमात पाळधीकरांच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी फॉगिंग मशीन उपलब्ध करून दिले. डासजन्य आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी गावात नियमित फवारणीसाठी या मशीनचा उपयोग करण्यात येणार आहे. 'गरज ओळखा आणि कृती करा' ही GPS परिवाराची ओळख GPS मित्र परिवाराच्या विविध सामाजिक उपक्रमांचा गौरव करताना पालकमंत्री म्हणाले की, समाजातील समस्या सांगणारे अनेक असतात; मात्र त्या समस्यांवर प्रत्यक्ष उपाय उभा करणारे हात महत्त्वाचे असतात. GPS परिवाराने ही भूमिका सातत्याने निभावली आहे. जलसंधारण व नदी-नाला खोलीकरण, फिरत्या नेत्रसेवेद्वारे तपासणी व उपचार, वारकरी सेवा, पूरग्रस्त कुटुंबांना मदत तसेच निराधार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि शिक्षणासाठी आधार अशा विविध उपक्रमांतून GPS परिवाराने सेवाभावाची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. याच सेवाभावी वाटचालीत आता उत्सवाच्या खर्चातून बगीचा आणि ऑक्सिजन पार्क उभारण्याचा उपक्रम आणखी एक नावीन्यपूर्ण पर्व ठरणार असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी नमूद केले. प्रतापराव पाटील यांनी मांडली बगीच्याची संकल्पना कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी GPS मित्र परिवारामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. गणपती व नवरात्रोत्सवातील अनावश्यक खर्चाला फाटा देऊन तो निधी गावासाठी कायमस्वरूपी उपयोगी ठरणाऱ्या कामासाठी वापरण्याची संकल्पना कशी पुढे आली, बगीच्याची रचना, प्रस्तावित ऑक्सिजन पार्क, नागरिकांना होणारा उपयोग आणि भविष्यातील देखभाल याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. मान्यवरांची उपस्थिती या भूमिपूजन सोहळ्यास उद्योगपती शरद कासट, उद्योगपती सुनील झंवर, सिद्धिविनायक महागणपतीचे चेअरमन श्रीकांतजी मणियार, माजी सभापती मुकुंद नन्नवरे, पाळधी बुद्रुकचे लोकनियुक्त सरपंच विजू बापू, पाळधी खुर्दचे सरपंच शरद कोळी, माजी उपसभापती दिनकर पाटील, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष दिलीप पाटील, उद्योजक दिलीप पाटील, अनिल कासट, श्रीकृष्ण साळुंखे, अलीम देशमुख, गोपाल सोनवणे, उपसरपंच अकबर खान, सावकार पठाण, सनवर सेठ, चंदू माळी, राजू भाट, माजी सभापती संजय रामदास पाटील, आरिफ देशपांडे, हारून बागवान, नाना पाटील सर यांच्यासह GPS मित्र परिवाराचे सदस्य, ग्रामस्थ व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण माळी यांनी केले, तर आभार प्रशांत झंवर यांनी मानले.

बाहेरपुरात मानाच्या गणपती बाप्पाचे दिमाखदार आगमन!

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: बाहेरपुरा येथील मानाच्या गणपती बाप्पाचे यंदाचे आगमन अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि अविस्मरणीय वातावरणात पार पडले. ढोल-ताशांचा गजर, फुलांची उधळण आणि हजारो गणेशभक्तांचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसर अक्षरशः गणेशमय झाला होता. आमदार किशोर आप्पा पाटील यांचे खंदे समर्थक तसेच बाहेरपुराची आन-बान-शान म्हणून ओळखले जाणारे नगरसेवक छोटू भाऊ चौधरी आणि नगरसेवक छोटू भाऊ गोहिल यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वातून या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे आणि गणरायावरील निस्सीम श्रद्धेमुळे बाप्पाचे आगमन मोठ्या जल्लोषात आणि भक्तिभावाने संपन्न झाले. यावेळी पुष्पा आणि शेखावत साहेब यांच्या दमदार एन्ट्रीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या आगमनामुळे संपूर्ण पाचोरा परिसर अक्षरशः पुष्पमय झाला होता. ढोल-ताशांचा निनाद, आकर्षक सजावट, फुलांची उधळण आणि गणेशभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे सोहळ्याला विशेष रंगत आली. या मंगल प्रसंगी आमदार कार्यसम्राट किशोर आप्पा पाटील, उपनगराध्यक्ष किशोर आप्पा बारवकर, नगरपालिका गटनेते सुमित दादा पाटील, नगरसेवक व शहर प्रमुख सुमित सावंत यांच्यासह बाहेरपुराचे लोकप्रिय नगरसेवक छोटू भाऊ चौधरी यांचे असंख्य कट्टर व निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी अहोरात्र मेहनत घेत हा भव्य सोहळा यशस्वी केला. गणरायाच्या आगमनाने बाहेरपुरासह संपूर्ण पाचोरा शहरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. *"गणपती बाप्पा मोरया!"*च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. शेवटी गणरायाच्या चरणी एकच प्रार्थना—बाहेरपुरा, पाचोरा आणि संपूर्ण तालुक्यावर बाप्पाची कृपादृष्टी सदैव राहो आणि सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी व आनंद नांदो!

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

भडगाव तालुका ग्रामीण कारागीर ग्रामोद्योग संस्थेची वार्षिक सभा

खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न



जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी: भडगाव तालुका ग्रामीण उद्योग कारागिरांची वि. का. सहकारी ग्रामोद्योग संस्था मर्यादित, भडगाव (जि. जळगाव) या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. चाळीसगाव रोडवरील 'विश्वकर्मा प्लायवूड' येथे संस्थेचे चेअरमन सुनील मोहन मिस्तरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.
त्यानंतर संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. अजेंड्यावरील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. वार्षिक अहवाल व ताळेबंद मंजूर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक तेरीज, नफा-तोटा पत्रक तसेच ताळेबंद पत्रक सभेसमोर सादर करण्यात आले. त्यावर चर्चा झाल्यानंतर सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक मंजूर मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. तसेच सन २०२६-२७ या आगामी आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक सभेसमोर सादर करून त्यास मंजुरी देण्यात आली. संस्थेचे कामकाज होणार डिजिटल संस्थेचे दैनंदिन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने ऑनलाइन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सभेत घेण्यात आला. यावेळी खैरनार साहेब यांनी ऑनलाइन सॉफ्टवेअरच्या कार्यपद्धतीविषयी सभासदांना सविस्तर माहिती दिली. डिजिटल प्रणालीमुळे संस्थेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता येण्यास मदत होणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. थकबाकी कर्ज वसुलीसह नवीन सभासदांबाबत चर्चा संस्थेकडील थकबाकी कर्जाच्या वसुलीबाबत कायदेशीर बाबींवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. तसेच संस्थेच्या कार्यक्षेत्रातील नवीन सभासदांना संस्थेत सामावून घेण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. भडगाव तालुका ग्रामीण उद्योग कारागिरांची वि. का. सहकारी ग्रामोद्योग संस्था मर्यादित, भडगाव (जि. जळगाव) या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

धुळ्यात 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात लाडक्या गणरायाची स्थापना!

डीजेचा दणदणाट अन् पारंपरिक वेशभूषेत बाप्पाचे स्वागत

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात धुळ्यात लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. गणेश चतुर्थीनिमित्त शहरातील विविध भागांमध्ये गणेशमूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. ढोल-ताशांचा गजर, डीजेच्या तालावर नाचणारे गणेशभक्त आणि पारंपरिक वेशभूषेत बाप्पाचे करण्यात आलेले स्वागत यामुळे संपूर्ण शहर गणेशमय झाले होते. शहरातील संतोषी माता चौक, फुलवाला चौक, सिव्हिल हॉस्पिटल रोड, दत्त मंदिर चौक यांसह विविध भागांमध्ये सकाळपासूनच गणरायाच्या मूर्ती खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू होती. अनेक भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला घरी घेऊन जात विधिवत स्थापना केली. यासोबतच विविध सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तींचेही मोठ्या उत्साहात मार्गस्थ करण्यात आले. गणरायाच्या आगमनामुळे लहान बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांचाच उत्साह



शिगेला पोहोचला होता. महिला आणि नागरिकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले.
ढोल-ताशांचा निनाद आणि डीजेच्या तालावर गणेशभक्तांनी ठेका धरल्याचे चित्र शहरातील विविध भागात पाहायला मिळाले. १४० वर्षांची परंपरा लाभलेल्या नाशिककर कुटुंबाचा गणपती धुळ्यातील गणेशोत्सवाला मोठी ऐतिहासिक आणि पारंपरिक परंपरा लाभली आहे. शहरातील नाशिककर कुटुंबाच्या गणपतीला तब्बल १४० वर्षांची परंपरा लाभली असून, किन्नर आखाड्याच्या गणरायालाही १०० वर्षांची परंपरा असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या पारंपरिक गणेशोत्सवाकडे धुळेकरांचे विशेष लक्ष असते. चोख पोलीस बंदोबस्त गणेश चतुर्थीनिमित्त शहरात नागरिकांची मोठी गर्दी होणार असल्याने पोलीस दलाच्या वतीने चौकाचौकात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.
वाहतूक सुरळीत राहावी आणि गणेशभक्तांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात आली. बाप्पाकडे सुख-समृद्धीची प्रार्थना लाडक्या गणरायाचे स्वागत करताना अनेक गणेशभक्तांनी आपल्या मनातील इच्छा बाप्पाच्या चरणी अर्पण केल्या. भरपूर पाऊस पडू दे, शेतकऱ्यांना सुख-समृद्धी मिळू दे, सर्वांना निरोगी आरोग्य लाभू दे आणि प्रत्येकाच्या जीवनात सुख-समाधान नांदू दे, अशी प्रार्थना भक्तांनी गणरायाकडे केली. दरम्यान, बऱ्याच वर्षांनंतर यंदा लाडक्या बाप्पाचा बारा दिवसांचा मुक्काम राहणार असल्याने गणेशभक्तांमध्ये विशेष उत्साह आहे. विशेषतः लहान मुलांमध्ये यंदाच्या गणेशोत्सवाबद्दल मोठी उत्सुकता आणि आनंद पाहायला मिळत आहे. ढोल-ताशांचा गजर, भक्तांचा जल्लोष आणि 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष... अशा उत्साहपूर्ण वातावरणात धुळ्यात गणेशोत्सवाला दिमाखात सुरुवात झाली आहे.

पी.आर. हायस्कूलमध्ये बाप्पाचे ढोल-ताशांच्या गजरात आगमन!

विद्यार्थ्यांनी स्वतः बनवले शाडू मातीचे गणपती

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: धरणगाव येथील पी.आर. हायस्कूलमध्ये गणेशोत्सवानिमित्त लाडक्या गणरायाचे ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले. यानंतर शाळेच्या सभागृहात श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना व आरती करण्यात आली. गणरायाच्या आगमनानिमित्त सकाळी ८ वाजता शाळेपासून परिहार चौक, कोट बाजार, मेन रोड, धरणी चौक, जैन गल्ली मार्गे मुख्य बाजारपेठेपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थी-विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून गेला. ढोल पथक आणि लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरत गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. मात्र, या मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने तयार केलेले शाडू



मातीचे गणपती. 'दप्तरमुक्त शनिवार' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या होत्या. या उपक्रमातून शाळेने पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला. यासोबतच विद्यार्थ्यांनी *"प्लास्टिकमुक्त धरणगाव"*चा संदेश देणारे फलक हातात घेतले होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक जीवनशैली आणि प्लास्टिकमुक्त परिसराचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. मिरवणुकीनंतर शाळेच्या सभागृहात मुख्याध्यापक डी. एस. पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी तसेच शिक्षकवृंदांच्या उपस्थितीत गणरायाची आरती करण्यात आली. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पुढील पाच दिवस शाळेत दररोज सकाळी व संध्याकाळी विद्यार्थ्यांकडून गणरायाची आरती करण्यात येणार असून, विविध क्रीडा स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्याध्यापक डी. एस. पाटील यांनी दिली. विद्यार्थ्यांचा उत्साह, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती आणि प्लास्टिकमुक्त धरणगावचा संदेश यामुळे पी.आर. हायस्कूलचा गणेशोत्सव यंदा सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचा आदर्श ठरला आहे.

नशिराबादच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गणरायाची उत्साहात स्थापना

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद । प्रतिनिधी: न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिरात श्री गणेशाची स्थापना मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात करण्यात आली. गणेशोत्सवानिमित्त शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी आकर्षक सजावट करून पर्यावरणपूरक आरास साकारली. यावेळी विद्यार्थ्यांमधून बाल गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी चित्राक्षी चौधरी, उपाध्यक्षपदी ज्ञानिका पाटील, खजिनदारपदी करण महाजन, सचिवपदी गितेश चव्हाण, तर सहसचिवपदी स्वराज भावसार यांची निवड करण्यात आली. त्यानंतर सहसचिव स्वराज भावसार यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत पूजा करून मूर्तीची स्थापना करण्यात आली. गणरायाच्या आगमनाने आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शाळेचा परिसर आनंदमय व भक्तिमय झाला. श्री गणेश स्थापना व आरतीनंतर उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला नशिराबाद नगरीचे नगराध्यक्ष तथा संस्थेचे कार्याध्यक्ष योगेश पाटील, सचिव मधुकर चौबे, संचालक जनार्दन माळी, राजेश पाटील, ॲड. प्रदीप देशपांडे, माध्यमिक विभागाचे उपशिक्षक जितेंद्र महाजन, राजेंद्र पाचपांडे, मुख्याध्यापक प्रविण महाजन यांच्यासह माध्यमिक व प्राथमिक विभागातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी कार्याध्यक्ष योगेश पाटील यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या आकर्षक सजावटीचे कौतुक केले. तसेच शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करणाऱ्या समर्थ वाणी याचे विशेष अभिनंदन केले. पर्यावरणाचे संरक्षण लक्षात घेऊन सर्वांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सवाच्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचे नियोजन स्वाती अत्तरदे, दीपमाला सपकाळे, संगीता जोशी आणि जयश्री चौधरी यांनी केले असून त्यांना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.

छ. संभाजीनगर: सावळदबाऱ्यात दूषित पाणीपुरवठ्याचा आरोप

ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त



जन सम्राट टाईम्स

सावळदबारा | प्रतिनिधी :सावळदबारा ग्रामपंचायत हद्दीत दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पाणीपुरवठ्याच्या ठिकाणी मृत पक्ष्यांचे अवशेष आढळल्याचा दावा नागरिकांनी केला असून, त्यामुळे गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पाण्याला दुर्गंधी; स्वच्छतेकडे दुर्लक्ष? नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून हे पाणी पिण्यायोग्य नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.
पाण्याची टाकी तसेच मुख्य जलस्रोताची नियमित स्वच्छता व निर्जंतुकीकरण करण्यात येत नसल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठ्याच्या ठिकाणी मृत पक्षी आढळल्याचा दावा असून, या प्रकाराची ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने दखल घेऊन उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न दूषित पाण्यामुळे गावातील काही लहान मुले आणि वृद्धांना उलट्या, जुलाब तसेच त्वचेच्या समस्यांचा त्रास होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र, या आरोग्यविषयक तक्रारींचे वैद्यकीय किंवा प्रयोगशाळेतील कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पाण्याची अधिकृत तपासणी होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीकडून प्रतिसाद नाही या प्रकरणाबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. पाणीपुरवठ्यासाठी 15 व्या वित्त आयोगाच्या 'Tied Grant' अंतर्गत निधी उपलब्ध होत असतानाही पाणी शुद्धीकरण आणि स्वच्छतेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. नागरिकांच्या प्रमुख मागण्या पाणीपुरवठ्याच्या टाकीची तातडीने स्वच्छता करून निर्जंतुकीकरण करावे. पाण्याचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत. पाणी पिण्यायोग्य असल्याची खात्री होईपर्यंत नागरिकांना टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करावा. पाणीपुरवठ्याच्या स्रोताची नियमित तपासणी व स्वच्छता सुनिश्चित करावी. दरम्यान, पुढील 48 तासांत प्रशासनाने या प्रश्नाची दखल घेऊन ठोस उपाययोजना न केल्यास पंचायत समिती, सोयगाव तसेच जिल्हा परिषदेसमोर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

जळगाव महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती

सायबर फसवणूक टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत दिवसेंदिवस वाढत असलेल्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिक तसेच कर्मचारी वर्गामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (KBCNMU), जळगाव आणि Quick Heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सायबर फसवणुकीच्या विविध



प्रकारांची सविस्तर माहिती देण्यात आली. संशयास्पद फोन कॉल, मेसेज, ई-मेल किंवा लिंकद्वारे होणारी फसवणूक कशी ओळखावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सायबर गुन्ह्याची घटना घडल्यास घाबरून न जाता कोणती तातडीची पावले उचलावीत, याचीही माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहार करताना आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विशेषतः OTP, PIN, पासवर्ड तसेच बँक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये, असा महत्त्वपूर्ण संदेश कर्मचाऱ्यांना देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धती, फसवणुकीचे संभाव्य धोके आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यात आला. त्यामुळे दैनंदिन डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षितपणे करण्यासाठी कर्मचाऱ्यांना उपयुक्त माहिती मिळाली. या जनजागृती उपक्रमात स्नेहल पाटील आणि वैष्णवी पाटील यांनी सक्रिय सहभाग घेत महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर सुरक्षेशी संबंधित विविध बाबी जाणून घेतल्या. या कार्यक्रमासाठी Dr. R. B. Amale Sir यांचे मार्गदर्शन लाभले. डिजिटल युगात वाढत्या सायबर धोक्यांच्या पार्श्वभूमीवर अशा जनजागृती उपक्रमांमुळे कर्मचारी आणि नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत अधिक सजगता निर्माण होण्यास मदत होणार आहे. डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर आणि त्यासोबत दिवसेंदिवस वाढत असलेल्या सायबर फसवणुकीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिक तसेच कर्मचारी वर्गामध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ-tion यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांची सविस्तर माहिती देण्यात आली. संशयास्पद फोन कॉल, मेसेज, ई-मेल किंवा लिंकद्वारे होणारी फसवणूक कशी ओळखावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सायबर गुन्ह्याची घटना घडल्यास घाबरून न जाता कोणती तातडीची पावले उचलावीत, याचीही माहिती देण्यात आली.